महाराष्ट्र शासन
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

टेलिफोन नं-०२३१-२६४१५८३ फॅक्स नं.०२३१-२६४४३६९
ईमेल- storercsmgmck@gmail.com वेबसाईट - www.rcsmgmc.ac.in

जा.क्र/राछशामशावैमवछप्रासरुको/आस्था ४/ ९६५० /२०२५ दिनांक:- १३/०५/२०२५

# प्रसिध्दीपत्रक

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर या संस्थांमधील गट – ड (वर्ग -४) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत परिक्षा दिनांक तसेच परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याची लिंक प्रसिध्द करणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई अधिनस्थ संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई अंतर्गत राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय यांच्या आस्थापनेवरील गट-ड (वर्ग-४) संवर्गातील विविध रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेकरीता या कार्यालयाचे पत्र क्र. राधशामशावैमवछप्रासरुको/गट-ड/जाहिरात/५१७/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनसुरुन उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज भरुन घेण्यात आलेले असून सदरच्या सरळसेवा भरती प्रक्रियेची परिक्षा दिनांक १९ मे, २०२५ रोजी महाराष्ट्रातील विविध परिक्षा केंद्रांवर ऑनलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. सदरची ऑनलाईन परिक्षा ही एकूण दोन सत्रामध्ये घेण्यात येणार आहे. सदर परिक्षेचे वेळापत्रक खालीप्रमाणे,

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | परिक्षेचा दिनांक | दिनांक १९ मे, २०२५ | |
| ०२ | प्रथम सत्र परिक्षा | Reporting Time | सकाळी ०८: ०० वा. |
| ०३ | द्वितीय सत्र परिक्षा | Reporting Time | दुपारी १२: ०० वा. |

वरील कोष्टकामध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण दोन सत्रांमध्ये ऑनलाईन (Computer Based ) परिक्षा घेण्यात येणार असून सर्व परिक्षार्थी यांनी विहीत वेळेत परिक्षा केंद्रांवर उपस्थित राहावयाचे आहे .तसेच सदर परिक्षेचे परिक्षा प्रवेशपत्र खाली नमूद लिंक वर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

**http://ibpsonline.ibps.in/rcsmgmcoct24/oecla_may25/login.php?appid=fb28654851e925a3f34b0617b8af22f2** सर्व परिक्षार्थी यांना सूचित करण्यात येते कीसदर लिंकवरुन परिक्षार्थी यांनी आपले परिक्षा प्रवेशपत्र उपलब्ध करुन घ्यावे.

DEAN LETTERS/Dean letters 2022

सर्व परिक्षार्थी यांनी त्यांच्या प्रवेशपत्रावर दिलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करावयाचे आहे. तसेच ऑनलाईन परिक्षेसंबंधी माहितीपुस्तिका या संस्थेच्या www.rcsmgmc.ac.in या संकेतस्थळावर तसेच kolhapur.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. तरी सर्व परिक्षार्थी यांनी माहितीपुस्तिकेचे अवलोकन करावे.

डॉ.एस.एस.मोरे,
अधिष्ठाता,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर तथा
समिती सदस्य, जिल्हा निवड समिती

श्री.अमोल येडगे, (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, कोल्हापुर
तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, गट -ड